IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# सुहासिनी माने यांचे स्त्री सुधारणा चळवळीतील योगदान एक अभ्यास

**डॉ. सुनील दिनकर पवार**

असोसिएट प्रोफेसर

आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज नागठाणे.

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***

*धार्मिक सुधारणा चळवळ*
*समाज*
*स्त्रीसुधारक*

**ABSTRACT**

महाराष्ट्राला सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीचा ऐतिहासिक वारसा आहे. भारतातील समाज व धर्म सुधारणा चळवळ बंगालमध्ये सुरू झाली परंतु ती व्यापक बनली ती महाराष्ट्रमधून असे दिसते. महाराष्ट्रमध्ये ही चळवळ व्यापक बनविण्यामध्ये अनेक समाजसुधारकांनी योगदान दिले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील समाजसुधारणा चळवळीमधील स्त्री स्वातंत्र्य हा एक महत्त्वाचा मुद्दा होता. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय राज्यघटनेने स्त्री- पुरुष समान तत्वाचा स्वीकार केला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्री चळवळ ही स्वातंत्र्यानंतरही सुरू राहिलेली दिसते. स्वातंत्र्य काळातही या चळवळीने महिला विकासासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येते. या सुधारणाचळवळीमध्ये अनेक स्त्री सुधारकांनी योगदान दिले. या सुधारकांच्या मालिकेमधील एक स्त्रीसुधारक म्हणजे सुहासिनी माने या होत.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 6%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Pawar, S. D. (2025). *सुहासिनी माने यांचे स्त्री सुधारणा चळवळीतील योगदान : एक अभ्यास.* IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS), 1(IV), **796–801.**

**प्रस्तावना -**

महाराष्ट्राला सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीचा ऐतिहासिक वारसा आहे. भारतातील समाज व धर्म सुधारणा चळवळ बंगालमध्ये सुरू झाली परंतु ती व्यापक बनली ती महाराष्ट्रमधून असे दिसते. महाराष्ट्रमध्ये ही चळवळ व्यापक बनविण्यामध्ये अनेक समाजसुधारकांनी योगदान दिले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील समाजसुधारणा चळवळीमधील स्त्री स्वातंत्र्य हा एक महत्त्वाचा मुद्दा होता. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय राज्यघटनेने स्त्री- पुरुष समान तत्वाचा स्वीकार केला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्री चळवळ ही स्वातंत्र्यानंतरही सुरू राहिलेली दिसते. स्वातंत्र्य काळातही या चळवळीने महिला विकासासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येते. या सुधारणाचळवळीमध्ये अनेक स्त्री सुधारकांनी योगदान दिले. या सुधारकांच्या मालिकेमधील एक स्त्रीसुधारक म्हणजे सुहासिनी माने या होत.

**संशोधनाची गृहितके -**

1 महाराष्ट्राला समाज व धर्म सुधारणा चळवळीची परंपरा आहे.

2 . स्त्री सुधारणा चळवळीने स्त्रियांच्या हक्क , अधिकार व स्वातंत्र्यासाठी भूमिका बजावली आहे.

3 . महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये स्त्री सुधारणाचळवळ व्याप्त होती.

4. स्त्री सुधारणा चळवळीमधील सुहासिनी माने यांचे कार्य उल्लेखनीय आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे -**

1 . स्त्री सुधारक म्हणून सुहासिनी माने यांच्या सामाजिक कार्याचा अभ्यास करणे.

2 . सुहासिनी माने यांच्या स्त्री सुधारणा चळवळीतील कार्याचा अभ्यास करणे.

3 सुवासिनी माने एक स्त्री सुधारक म्हणून त्यांच्या कार्याचे चिकित्सक परीक्षण करणे.

**संशोधन पद्धती -**

सदर शोधनिबंधासाठी ऐतिहासिक, विशू विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. तसेच मुलाखत, डिजिटल साधने, वृत्तपत्रे अशा दुय्यम व काही प्राथमिक साधनांचा वापर करण्यात आला आहे.

**जीवन वृत्तांत -**

सुहासिनी माने यांचा जन्म 6 जून 1940 मध्ये पुणे येथील एका ब्राह्मण (सीकेपी) कुटुंबामध्ये झाला. त्यांच्या वडिलांचे नाव गजानन राजे होते. सुहासिनी यांचे चौथीपर्यंतचे शालेय शिक्षण पुणे येथे तर पाचवी ते अकरावी पर्यंतचे शिक्षण लोणंद येथे मालोजीराजे विद्यालयात झाले. सन 1958 मध्ये त्या मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाल्या. त्यांच्या वडिलांची नोकरीनिमित्ताने लोणंद येथे बदली झाल्यामुळे त्यांचे कुटुंब लोणंद येथे वास्तव्यात होते. [१] शालेय जीवनापासूनच त्यांचा स्वभाव कडक होता. त्या हुशार व विचारीक होत्या. त्यांना शिक्षणाची आवड होती. सन 1958 मध्ये त्यांचा विवाह प्रसिद्ध वकील गुंडोपंत माने यांच्याशी झाला. सुहासिनी यांना माहेरहुनच पुरोगामी विचारांचा वारसा लाभला होता. त्याचाच एक भाग म्हणजे त्यांचा गुंडोपंत माने यांच्याशी झालेला आंतरजातीय विवाह होय.[२] सुहासिनी या विवाहबद्ध झाल्या त्यावेळी त्या केवळ मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण होत्या परंतु त्यांना शिक्षणाची कमालीची आवड असल्याने संसार सांभाळून त्यांनी एम.ए ची पदवी संपादन केली. [३] आपल्या शिक्षणाचा उपयोग मागास भागातील समाजास व्हावा यासाठी त्यांनी कार्य सुरू केले. त्यांच्या या कार्यात त्यांना त्यांचे पती गुंडोपंत माने यांची मोलाची साथ मिळाली. त्याचबरोबर त्यांच्या सहकारी विजयालक्ष्मी शिंदे, कमल सोनवणे, इंदुमती अल्बन्ना, शम्शाद डांगे यांची विशेष साथ मिळाली.

**समाजकार्यास प्रारंभ -**

सुहासिनी यांना शालेय जीवनापासूनच समाजकार्याची आवड होती. गोवा मुक्ती आंदोलनामधील सैनिकांना लोणंद येथे जेवण पुरविण्याच्या कार्यापासून त्यांनी स्वतःला समाजकार्यात झोकून दिले.[४] त्याचबरोबर दारूबंदी कार्यक्रम त्यांनी हाती घेतले. यामध्ये त्यांचे पती एडवोकेट माने यांची त्यांना साथ मिळाली. त्यांनी या काळात अनेक धार्मिक ग्रंथांचे वाचन केले तसेच थोर महापुरुषांची चरित्रे वाचली. यातूनच त्यांना स्त्रीसमाज सुधारणा करण्याची प्रेरणा मिळाली. आपल्या कार्याच्या व्याप्तीसाठी त्यांनी संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेतला. या संस्थेच्या माध्यमातून आपणास आपले लक्ष गाठता येईल असे त्यांना वाटले. यातूनच महिला सामाजिक समता परिषदेची स्थापना झाली.

**महिला सामाजिक समता परिषद -**

महिला सामाजिक समता परिषदेची स्थापना १ सप्टेंबर 1981 रोजी झाली. [५] संस्थेच्या स्थापना वर्षी नोव्हेंबर 1981 मध्ये भव्य महिला परिषद आयोजित केली. त्या परिषदेमध्ये महिलांच्या विविध सामाजिक प्रश्नाविषयी चर्चा करून त्यावर उपाययोजना कोणत्या करता येतील याविषयी निर्णय झाले. इथून पुढे महिला सामाजिक परिषदेच्या माध्यमातून सुहासिनी माने यांनी संघटनात्मक पातळीवर कार्य सुरू केले.

**जनसहयोग शिबिर -**

महिला सामाजिक समता परिषदेच्या माध्यमातून सन १९८४ साली जनसहयोग हे दहा दिवसांचे शिबिर पिंप्रद येथे आयोजित केले. सदर शिबिरामधून महिलांचे प्रश्न जाणून घेऊन त्यांचे निवारण कसे करता येईल याविषयी जनजागृती मोहीम हाती घेण्याचे ठरवले.[६]

**महिला मेळावा -**

सुहासिनी माने यांनी पुढाकार घेऊन 11 एप्रिल 1987 रोजी महिला सामाजिक समता परिषद आणि फलटण तालुका कायदेविषयक सल्ला समिती यांच्या संयुक्त विद्यमाने महिला मेळाव्याचे आयोजन केले या मेळाव्यात मुलांनी हुंडा न घेता लग्न करण्याचा व मुलींनी हुंडा मागणाऱ्या मुलाबरोबर लग्न न करण्याचा आणि आई-वडिलांनी हुंडा देऊन घेऊन आपल्या मुला-मुलींचे विवाह न करण्याच्या लेखी शपथा घेतल्या. केवळ शपथच घेतली नाही तर पुढे अनेक मुला मुलींनी, पालकांनी त्याची अंमलबजावणी केली. या मेळाव्यात प्रबोधनपर ज्योती मापेकर मुंबई यांची "मुलगी झाली हो" हे पथनाट्य सादर करण्यात आले.[७]

**स्त्रीमुक्ती संघटनेशी संबंध –**

अखिल महाराष्ट्र राज्यपातळीवर आपल्या कार्याला व्याप्ती मिळावी या उद्देशाने राज्यपातळीवरील असलेल्या स्त्रीमुक्ती संघटना संपर्क समितीशी सुहासिनी माने यांनी आपली संस्था सभासद केली. याअंतर्गत संस्थेने दोन दिवसांचे शिबिर मोठ्या पातळीवर यशस्वी केले. शिबिराला राज्यातील विविध भागातून महिला हजर होत्या.[८]

**महिला मंडळाची स्थापना -**

महिला सामाजिक समता परिषदेच्या कार्याची वाटचाल विस्तृत होत चालली होती. आपल्या कार्याची व्याप्ती खेड्यापाड्यात, ग्रामीण भागात पोहोचावी या दृष्टीने सुहासिनी माने यांनी फलटण तालुक्यात महिला मंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतला. संस्थेअंतर्गत खेड्यातील महिलांना संघटितरित्या काम करण्यास प्रवृत्त करून त्यांना महिला मंडळ स्थापन करून दिली. यातील काही महिला मंडळे खालील प्रमाणे होती.[९]

मठाचीवाडी - संस्थेअंतर्गत 5 सप्टेंबर ते 12 सप्टेंबर 1988 मध्ये मठाचीवाडी येथे क्रांती महिला मंडळ स्थापन करून दिले. या मंडळास सरकार मान्य रेशनिंगचे दुकान मिळवून दिले. तसेच गोकुळ दूध संकलन केंद्र सुरू करून दिले.

तरडगाव - यानंतर संस्थेच्या वतीने 21 ऑक्टोबर ते 28 ऑक्टोबर 1988 या कालावधीतील कार्यामध्ये प्रगती महिला मंडळ स्थापन करून दिले.

वाखरी - महिला सामाजिक समता परिषदेच्या कार्यांतर्गत वाखरी येथे 15 मे 1989 ते 22 मे 1989 या शिबिरा अंतर्गत नवयुग महिला मंडळ व गोकुळ बालवाडी सुरू करून दिली. त्याशिवाय 70 महिलांना स्वावलंबी बनण्याच्या दृष्टीने बनबिहारी निंबकर यांच्या मदतीने शेळीपालनासाठी शेळ्या वाटप केले.

सुरवडी - यानंतर संस्थेच्या कार्याच्या पाठपुराव्याअंतर्गत सुरवडी येथील 14 ऑगस्ट 1991 ते 21 ऑगस्ट 1991 या कालावधीतील शिबिरामध्ये आदर्श महिला मंडळ स्थापन करून दिले.

खामगाव - महिलांना बचतीची सवय व्हावी व त्यातून त्यांना अर्थसहाय्य मिळावे या दृष्टीने सुहासिनी यांनी येथील शिबिरात महिलांच्या मीटिंग घेऊन बचत गटांची स्थापना केली.

सासकल - संस्थेच्या कार्याच्या अनुषंगाने सासकल येथे 16जुन 2002 ते 23 जून 2002 या कालावधीतील शिबिरामध्ये या भागातील महिलांच्या मीटिंग घेऊन त्यांच्यात आर्थिक प्रबोधन करून बचत गट स्थापन करून दिले.

विडणी - त्याचबरोबर संस्थेच्या कार्यांतर्गत 21 एप्रिल 2007 ते 28 एप्रिल 2007 या कालावधीमध्ये विडणी येथे शिबिर घेतले. येथे त्यांनी उत्तरेश्वर महिला मंडळ स्थापन केले. या मंडळास पंचायत समितीच्या अनुदानातून मिरची डंक उभारून दिला तसेच बचत गट सुरू करून दिले.

जिंती - महिला सामाजिक समता परिषदेअंतर्गत महिला सुधारणाची वाटचाल दिवसेंदिवस वाढत चालली होती. वरील भागाप्रमाणेच जिंती येथे 1991 मध्ये खादी ग्रामोद्योग मंडळ सातारा यांच्या सहकार्याने महिलांसाठी सूतकताई केंद्र सुरू करून अंबर चरखा उद्योगाचा शुभारंभ केला. या मंडळाच्या स्थापना कार्यक्रमाचे समाज कल्याण मंत्री माननीय रामदास आठवले यांच्या शुभहस्ते उद्घाटन करण्यात आले होते.

कायदेविषयक सल्ला अभियान -

सुहासिनी माने यांनी महिला सामाजिक समता परिषदेच्या माध्यमातून कायदेविषयक साक्षरता अभियान उभारून महिलांना कायदेविषयाची माहिती करून देऊन महिलांचे हक्क ,कर्तव्य यांचे मार्गदर्शन करण्यात आले. यासाठी त्यांनी वकील, संपूर्ण तालुक्यातील मान्यवर तसेच तहसीलदार यांचे सहकार्य घेतले. यातील खालील गावांमध्ये असे कॅम्प भरवले.

तरडगाव, कोरेगाव ,लोणंद ,जिंती ,राजुरी,दालवडी, सैदापूर, कराड, मायणी, लोणंद, साखरवाडी, गुणवरे, पिंप्रद, विडणी, मार्डी मान, खंडाळा ,महाबळेश्वर, भुईंज, बरड, बिजवडी, दहिवडी, वाजेगाव, मठाचीवाडी, पाच सर्कल, कोळकी, देऊर, तांबवे, तावडी, एकसळ, शिरढोण, राजवडी इत्यादी. वरील प्रमाणे माने यांचे कार्य पाहता केवळ तालुक्यापुरते मर्यादित न राहता जिल्हाभर ते व्याप्त झालेले दिसून येते. [१०]

कौटुंबिक सल्ला सेवा केंद्र -

सुहासिनी माने यांनी महिलांच्या सर्वांगीण विकासास चालना देण्याच्या हेतूने त्यांना संस्थेच्या माध्यमातून 20 नोव्हेंबर 1990 पासून केंद्रीय समाज कल्याण बोर्ड, नवी दिल्ली यांच्या मंजुरीने व महाराष्ट्र राज्य समाज कल्याण व सल्लागार बोर्ड मुंबई यांचे शिफारशीने कौटुंबिक सल्ला सेवा केंद्र चालवले. या त्यांच्या कार्याला तत्कालीन अनेक मान्यवरांनी पाठिंबा देऊन त्यांच्या कार्याला प्रेरणा व उत्तेजन दिले होते. या केंद्रात नवऱ्याने दारू नशेत पत्नीला मारहाण करणे पासून ते विधवेला तिच्या हक्काचे हिश्याचे काहीच न देता घरातून हाकलून लावणे पर्यंतच्या, तसेच शारीरिक, मानसिक, आर्थिक अन्याय अत्याचाराच्या केसेस मोफत सोडविल्या जात असत. त्यामुळे ही संस्था महिलांची आधारस्तंभ बनली होती. यातील केसेसचे प्रमाण पाहता स्थापनेपासून ते 2002 अखेर 1768 केसेस दाखल होत्या. त्यातील 995 केसेस मध्ये तडजोडी झाल्या तर उरलेल्या 260 केसेस कायदेविषयक मदतीसाठी पाठवल्या व 394 केसेस फाईल करण्यात आल्या. याशिवाय 119 केसेसची कार्यवाही सुरू होती. सन 1991 ते 2017 पर्यंतचे केसेसचे प्रमाण पाहता एकूण 3918 केसेस होत्या. [११]

एड्स प्रतिबंधक प्रकल्प -

महिला सामाजिक समता परिषदेअंतर्गत एड्स सारख्या दुर्धर आजाराबाबत जनजागृती करण्याचे कार्य सुहासिनी माने यांनी केले. त्यानुसार 1 जून 1997 ते 31 मे 1998 या कालावधीत फलटण शहर व मलठण येथे एड्स नियंत्रण जनजागरण प्रकल्प राबविला गेला. सदर प्रकल्पांतर्गत प्रभाग निहाय प्रबोधन शिबिरे, तज्ञ डॉक्टरांची मार्गदर्शनपर व्याख्याने, शासनाची माहिती पत्रके वितरण, फिल्म- व्हिडिओद्वारे, पोस्टर वाटप करणे, संस्थेने या संबंधाने तयार केलेली पत्रके वाटप करणे इत्यादीद्वारे एड्स सारख्या भयानक रोगाला कशाप्रकारे प्रतिबंध करता येतो, याविषयी जनजागृती व प्रबोधन महिला व पुरुष वर्गात करण्यात आले. [१२]

महिला मंडळाची स्थापना -

सुहासिनी माने यांनी संस्थेच्या माध्यमातून स्त्री वर्गाच्या विकासाकडे अधिक लक्ष दिले होते. त्याचा एक भाग म्हणजेच महिला मंडळाची स्थापना होय. खेड्यातील महिलांना संघटित करून त्यांना काम करण्यास प्रवृत्त करून त्यांचे संघटन कायम टिकावे या हेतूने महिला मंडळे स्थापन केली. या महिला मंडळांमध्ये क्रांती महिला मंडळ मठाचीवाडी, प्रगती महिला मंडळ तरडगाव, नवयुग महिला मंडळ वाखरी, आदर्श महिला मंडळ सुरवडी, तातमगिरी महिला मंडळ तातमगिरी, उत्कर्ष महिला मंडळ मुरूम, दामिनी महिला मंडळ बरड, उत्तरेश्वर महिला मंडळ विडणी, पद्मावती महिला मंडळ टाकळवाडा, जगदंबा महिला मंडळ खामगाव, जिजामाता महिला मंडळ सासकल, इत्यादींचा समावेश होतो. [१३]

निर्वाचित महिलांची कार्यशाळा -

संस्थेच्या माध्यमातून हिंद स्वराज्य ट्रस्ट पुणे यांच्या सहकार्याने 24 व 25 फेब्रुवारी 2001 मध्ये दोन दिवसीय ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद या स्थानिक संस्थांमध्ये निवडून आलेल्या महिला सदस्यांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली. सदर कार्यशाळेमध्ये कोरेगाव, सातारा अशा भागातून 56 महिलांनी सहभाग घेतला. या कार्यामध्ये गटविकास अधिकारी, आरोग्य अधिकारी, वकील, हिंद ट्रस्टचे प्रतिनिधी, माननीय श्री वि.ग. दंडवते, संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती सुहासिनी माने यांनी मार्गदर्शन केले. यामधून महिलांचे हक्क, जबाबदाऱ्या व कर्तव्य अशा विषयावर विचार मंथन झाले. यावेळी संस्थेच्या वतीने ज्या डायरी वितरित करण्यात आल्या त्या डायरीमधून सदस्यांच्या अखत्यारीतील कामे छापून त्यांना सततचे मार्गदर्शन होईल यासाठी प्रयत्न केले. [१४]

असंघटित महिलांचे शिबिर -

सुहासिनी माने यांनी संस्थेच्या माध्यमातून समाजातील असंघटित महिलांच्यासाठी सुद्धा योगदान दिले. त्यानुसार श्रमिक शिक्षा बोर्ड पुणे यांच्या सहकार्याने 13 व 14 मार्च 2009 असे दोन दिवसीय असंघटित महिलांचे शिबिर भरवण्यात आले. सदर शिबिरामध्ये शेतावर मजुरी करणारे, वीटभट्टीवर काम करणाऱ्या तसेच घरोघरी फिरून धुनी भांडी करणाऱ्या अशा चाळीस महिलांनी

सहभाग घेतला. या शिबिरामध्ये त्यांना विद्यावेतन वाटण्यात आले तसेच श्रमिक शिक्षण संस्थेचे प्रतिनिधी श्री गोडबोले, डॉ. बर्गे एडवोकेट सुजाता प्रधान, एडवोकेट शिरीन शहा व सुहासिनी माने यांनी मार्गदर्शन केले. [१५]

विवाहाची वयोमर्यादा बदलण्याच्या निर्णयाला विरोध -

तत्कालीन आयोगाने मुलाचे वय 18 व मुलीचे वय 16 ही विवाह मर्यादा असावी अशी शिफारस केली होती. तेव्हा ही शिफारस योग्य नाही ती समाजहित करणारी नाही, तिचे कायद्यात रूपांतर करू नये अशी मागणी महिला सामाजिक समता परिषदेच्या आयोजित केलेल्या चर्चासत्रात सुहासिनी माने यांनी केली[१६].याबाबत त्यांनी मत मांडले की ‘आयोग काळाची चक्रे उलटी फिरवून महिलांना 12 व्या व 13 व्या शतकात नेऊन ठेवू इच्छित आहे. आधीच मुलींचे परिस्थितीमुळे शिक्षणात अडथळे येतात, त्यातून सोळाव्या वर्षी पालकांना मुलीचे लग्न करण्याची मुभा कायद्याने मिळाली तर ते 12-13 या वर्षीसुद्धा बोहल्यावर मुलींना चढवायला लागतील, मग आयोग पुढे काही काळाने 16 वर्षापेक्षा खाली वयोमर्यादा कशावरून आणणार नाही’ अल्पवयीन मुलींची लग्न विशिष्ट थरातून होतात. त्यांना आणखी गर्तेत घालणारा हा कायदा ठरणार असल्याने त्याला विरोध झाला पाहिजे असे आवाहन त्यांनी केले. त्यासाठी जनप्रबोधन करणे, स्वाक्षरी मोहीम, महाविद्यालयांमधून चर्चासत्रे तसेच सामाजिक , शैक्षणिक, आर्थिक, वैद्यकीय , औद्योगिक क्षेत्रातील प्रमुखांची परिषद घेणे असे निर्णय घेण्यात आले.[१७]

महिलांच्या स्वयंरोजगारासाठी कार्य -

सुहासिनी माने यांनी आपल्या संस्थेच्या माध्यमातून महिलांना आर्थिक दृष्ट्या सबल करण्याच्या दृष्टीने जे कार्य केले त्यापैकी त्यांना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन हे एक महत्त्वाचे कार्य होय . फलटण तालुक्यातील व शहरातील छोटे व्यवसाय करणाऱ्या गरीब व गरजू महिलांना स्वयंरोजगार योजनेअंतर्गत महिला व बालकल्याण विभाग सातारा यांचे मार्फत 135 महिलांना पाचशे रुपये मिळवून दिले. हे कार्य त्यांनी 1988 मध्ये सुरू केले आहे. या विभागाकडून विधवेच्या मुलांच्या विवाहासाठी 2000 रुपये मिळवून दिले तसेच जिल्हा समाज कल्याण खात्याकडून आंतरजातीय विवाह जोडप्यांना 15000 रुपये व संसार उपयोगी भांडी मिळवून दिली. [१८]

महिलांसाठी व्यायामशाळा -

संस्थेच्या वतीने सुहासिनी यांनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सातारा यांच्या मंजुरीने महिला व मुलींसाठी अध्ययावत व्यायाम शाळा सन 2013 मध्ये स्थापन केली. या व्यायाम शाळेमध्ये अल्प फी मध्ये प्रवेश दिला जातो. यातून महिलांच्या शारीरिक दृष्ट्या सबलीकरणावर सुवासिनी माने यांनी भर दिल्याचे दिसून येते.[१९]

सुहासिनी माने यांनी भूषवलेली पदे -

सुहासिनी माने यांच्या कार्याचा व्याप दिवसेंदिवस वाढत असतानाच त्यांच्या या कार्याला अधिक बळकटी देण्याच्या हेतूने त्यांना इतर संस्थांमध्ये अनेक पदे भूषवता आली. त्यामध्ये फलटण तालुका महिला मंडळाच्या सचिव 1972 ते 84
मागासवर्गीय मुलींचे शासकीय वस्तीगृह सातारा जिल्हा निवड समिती सदस्या 1974 ते 77
महाराष्ट्र राज्य कल्याण सल्लागार बोर्ड मुंबई अंतर्गत सातारा व सांगली जिल्हा कमिटी सदस्य 1974 ते 1992 हुंडा निर्मूलन दक्षता समिती सातारा जिल्हा सदस्य
विशेष कार्यकारी अधिकारी फलटण बारा वर्षे
सातारा जिल्हा सामाजिक सुरक्षा समिती सदस्य 18 वर्षे
महाराष्ट्र राज्य स्त्री मुक्ती संघटना सदस्य
सातारा जिल्हा महाराणी जिजामाता सहकारी पतपुरवठा संस्थेच्या संचालक
महाराष्ट्र राज्य सावित्रीबाई फुले स्मृती प्रतिष्ठान नायगाव उपाध्यक्ष
माकडवाले मागासवर्गीय व्यावसायिक सहकारी सोसायटी फलटण संस्थापक
स्वावलंबी महिला औद्योगिक सहकारी संस्था फलटण संस्थापक अध्यक्ष
महिला सामाजिक समता परिषद फलटण संस्थापक अध्यक्ष
महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळ फलटण संस्थापक सेक्रेटरी
सातारा जिल्हा महिला विकास सहकारी पतसंस्था मर्यादित फलटण संस्थापक अध्यक्ष
फलटण तालुका महिला काँग्रेस अध्यक्ष सन 1999 पर्यंत

माजी संघटक प्रमुख पश्चिम महाराष्ट्र राष्ट्रवादी महिला काँग्रेस पार्टी
महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी महिला काँग्रेस पार्टी माजी उपाध्यक्ष
सोलापूर ,कोल्हापूर , लातूर राष्ट्रवादी महिला काँग्रेस निरीक्षक निमंत्रित
महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी महिला काँग्रेस पार्टी
अखिल भारतीय राष्ट्रवादी महिला काँग्रेस पार्टी नवी दिल्ली
राष्ट्रवादी ग्राहक संरक्षण समिती महाराष्ट्र प्रदेश सल्लागार इत्यादीं.[२०]

सुहासिनी माने यांना मिळालेले पुरस्कार -

सुहासिनी माने यांनी जे समाजसुधारण्याचे विशेषतः स्त्री सुधारण्याचे जे कार्य केले ते उल्लेखनीय स्वरूपाचे असे होते. त्यांच्या कार्याची पोचपावती म्हणून त्यांना विविध पुरस्कार देऊन गौरवण्यात आले व त्यांच्या कार्याला यातून अधिक प्रेरणा दिली गेली. या पुरस्कारांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र संस्था पुरस्कार 1994 - 95 [२१]
अहिल्यादेवी होळकर जिल्हास्तरीय पुरस्कार 1998 - 99 [२२]
आदर्श महिला पुरस्कार फलटण 1999
राष्ट्रीय पातळीवरील इंडिया इंटरनॅशनल ट्रेड फेअर नवी दिल्ली, द्वितीय क्रमांक बक्षीस 2005
स्वयंसिद्धा पुरस्कार फलटण, २००४-५
आदर्श महिला पुरस्कार जेष्ठ नागरिक संघ फलटण, २००९
डॉ. जोशी हॉस्पिटलचा महिला गौरव व स्त्री सशक्तीकरण पुरस्कार, 2017[२३] इत्यादींचा त्यामध्ये समावेश होतो.

निष्कर्ष -

सुहासिनी माने यांच्या महिला विषयक सुधारणा चळवळीतील कार्याचा अभ्यास केल्यानंतर त्यातून पुढील काही निष्कर्ष निघतात. ग्रामीण भागातील महिलांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देऊन त्यांची सर्वांगीण उन्नती करण्याच्या दृष्टीने महिला सामाजिक समता परिषदेच्या माध्यमातून सुहासिनी माने यांनी घेतलेला वसा हा उल्लेखनीय असा आहे. तसेच सुहासिनी माने कर्त्या सुधारक होत्या असे दिसून येते. सुवासिनी माने यांनी आपल्या कार्याच्या माध्यमातून फलटणचे नाव महाराष्ट्रात प्रसिद्ध केले. तसेच सुवासिनी माने या काही काळ राजकारणात राहूनही त्यांनी राजकारणाचा उपयोग समाजकारणासाठी करून घेतल्याचे दिसते. महिला बचत गटाची संकल्पना एकविसाव्या शतकामध्ये विस्तारित झालेली असली तरी तिची सुरुवात सुवासिनी माने यांनी विसाव्या शतकामध्येच केलेली होती. म्हणजेच त्यातून त्यांची दूरदृष्टी दिसून येते. स्वातंत्र्यानंतर स्त्री चळवळीमध्ये ज्या काही सुधारक होत्या त्यांच्या मालिकेतील आपले तन-मन-धन स्त्री उदारासाठी व समाज कार्यासाठी वाहून त्यांनी स्त्री चळवळीला बळकटी आणली.

संदर्भ

1 . मुलाखत , सुहासिनी माने, अध्यक्षा, महिला सामाजिक समता परिषद,फलटण, वेळ,4 वाजता,1810/2025
2 कित्ता
3 क्षीरसागर बबनराव, सुवासिनी माने एक मनस्वी व्यक्तिमत्व, साप्ताहिक अंजन, 30 /5/ 2004
4 मुलाखत उपरोक्त.
5 माने जी. बी प्रतिष्ठान नामकरण सोहळा विशेष अंक स्थैर्य, 3 /9 / 2002 पृ. 1.
6. कित्ता
7 कित्ता
8 कित्ता
9 संग्रहित कागदपत्र, क्रमांक 2 ,3
10 संग्रहित कागदपत्र क्रमांक, 3
11. संग्रहित कागदपत्र, क्रमांक 9.
12. संग्रहित कागदपत्र, क्रमांक 5
13. स्थैर्य विशेषांक, उपरोक्त पृष्ठ 1
14. संग्रहित कागदपत्र क्रमांक, 6
15. संग्रहित कागदपत्र क्रमांक, 6
16 स्थैर्य, उपरोक्त, पृष्ठ 2,3 2008
17 दैनिक पुढारी, 53/2008
18. संग्रहित कागदपत्र क्रमांक, 7
19 संग्रहित कागदपत्र क्रमांक, 12
20. संग्रहित कागदपत्र क्रमांक,1,2,6
21 दैनिक पुढारी, 5 डिसेंबर 2005
22 . दैनिक शिवसंदेश, 7 डिसेंबर 2002
23 . संग्रहित कागदपत्र क्रमांक, 6,7